31 MAR 2026 जनप्रवास
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# सायबर गुन्ह्यांवरील राष्ट्रीय परिसंवाद उत्साहात

## सायबर गुन्ह्यांचे वाढते प्रमाण, डिजिटल सुरक्षेची गरज आणि कायद्याच्या अंमलबजावणीतील आव्हाने यावर मार्गदर्शन

जनप्रवास : कोल्हापूर

शिवाजी विद्यापीठात सायबर गुन्ह्यांवरील राष्ट्रीय परिसंवाद उत्साहात पार पडला. या परिसंवाद उपक्रमात उपस्थित मान्यवरांनी सायबर गुन्ह्यांचे वाढते प्रमाण, डिजिटल सुरक्षेची गरज आणि कायद्याच्या अंमलबजावणीतील आव्हाने यावर सखोल मार्गदर्शन केले.

शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर येथील विधी विभागाच्या वतीने "द मॉडर्न डेज सायबरक्राइम्स: प्रॉब्लेम्स अँड सोल्यूशन्स" या विषयावर आयोजित एक दिवसीय राष्ट्रीय परिसंवाद उत्साहात पार पडला. कागल-हातकणंगले मॅन्युफॅक्चरर्स असोसिएशन (MAKH) यांच्या सहकार्याने आयोजित या कार्यक्रमास विद्यार्थी, संशोधक, कायदेविषयक तज्ज्ञ तसेच उद्योग क्षेत्रातील मान्यवरांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.



परिसंवादाचे उद्घाटन विद्यापीठाच्या मल्टी-पर्पज ऑडिटोरियम, सांख्यिकी विभाग येथे पार पडले. उद्घाटन समारंभासाठी प्रमुख पाहुणे म्हणून रमाकांत मालू, प्रसाद स्वर, मृणालिनी ईगावले, श्रीमती आळेकर, धोत्रे सर, गुरव तसेच कार्यक्रमाचे मुख्य समन्वयक डॉ. विवेक धुळे उपस्थित होते. यावेळी शिवाजी विद्यापीठाच्या विधी विभागाचे प्रमुख डॉ. व्ही. वाय. धुपदळे यांनी कार्यक्रमाची रूपरेषा स्पष्ट करून उपस्थित मान्यवरांची ओळख करून दिली. तसेच त्यांनी सर्व मान्यवरांचा शाल व श्रीफळ देऊन सन्मान केला. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानही त्यांनीच भूषविले.

### सायबर गुन्ह्यांची वाढती गुंतागुंत : प्रसाद स्वर यांचे मार्गदर्शन

या परिसंवादात बोलताना प्रसाद स्वर यांनी आजच्या डिजिटल युगातील सायबर गुन्ह्यांचे स्वरूप अत्यंत क्लिष्ट आणि वेगाने बदलणारे असल्याचे स्पष्ट केले. त्यांनी सायबर गुन्ह्यांची चौकशी करताना अनेक तांत्रिक अडचणी येतात यामध्ये डिजिटल पुरावे गोळा करणे, त्यांची सत्यता सिद्ध करणे, तसेच आंतरराष्ट्रीय स्तरावर गुन्हेगारांचे जाळे असल्यामुळे न्यायप्रक्रिया अधिक गुंतागुंतीची होते असल्याचे सांगितले

तसेच, सायबर गुन्ह्यांमध्ये वापरल्या जाणाऱ्या आधुनिक तंत्रज्ञानामुळे (जसे की कृत्रिम बुद्धिमत्ता, डार्क वेब इ.) तपास यंत्रणांसमोर नवे आव्हान उभे राहते. त्यामुळे सायबर कायदे, तांत्रिक ज्ञान आणि जागरूकता यांचा समन्वय अत्यंत आवश्यक असल्याचे त्यांनी अधोरेखित केले. "आजच्या काळात सायबर सुरक्षा ही केवळ तांत्रिक बाब नसून सामाजिक आणि कायदेशीर दृष्टिकोनातूनही अत्यंत गंभीर व आवश्यक विषय आहे," असेही त्यांनी नमूद केले.

### उद्योग क्षेत्रावर सायबर सुरक्षेचे महत्त्व

रमाकांत मालू यांनी उद्योग क्षेत्रात सायबर सुरक्षेचे वाढते महत्त्व अधोरेखित करताना सांगितले की, डिजिटल व्यवहार वाढत असताना डेटा संरक्षण आणि सायबर सुरक्षिततेकडे दुर्लक्ष करणे धोकादायक ठरू शकते.

### आभार प्रदर्शन व निष्कर्ष

कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन गुरव साहेब यांनी केले. त्यांनी सायबर सुरक्षेचे आजच्या जीवनातील महत्त्व अधोरेखित केले. सायबर गुन्ह्यांविरुद्ध कायदेशीर, तांत्रिक आणि सामाजिक उपाय शोधण्यासाठी हा परिसंवाद अत्यंत उपयुक्त ठरला असून उपस्थितांकडून सकारात्मक प्रतिसाद मिळाला. भविष्यात अशा उपक्रमांद्वारे सायबर सुरक्षा विषयक जनजागृती अधिक वाढविण्याची गरज असल्याचे मान्यवरांनी मत व्यक्त केले.

उपक्रम यशस्वी पार पडावा यासाठी यांनी घेतले विशेष परिश्रम या परिसंवादाच्या यशस्वी आयोजनासाठी आकाश कुंभार, योगेश धुरंधर, ओमकार शेलके, शिवरत्न माने, पूजा लोहार, वैष्णवी कोळी, गार्गी कुलकर्णी, सुरेखा यादव, प्रीती सुखसागर, ज्योती नळे, पल्लवी धप्पडवाड, साधिका संबोधी, रोजा शेख, आदित्य माने, क्षमा भट यांनी विशेष परिश्रम घेतले. त्यांच्या नियोजनबद्ध कार्यामुळे कार्यक्रम सुरळीत व प्रभावीपणे पार पडल्याचे आयोजकांनी नमूद केले.

### विविध विषयांवर सखोल चर्चा

या परिसंवादात सायबर गुन्ह्यांचे बदलते स्वरूप, डेटा संरक्षण व गोपनीयता, सायबर सुरक्षा कायदे, कृत्रिम बुद्धिमत्ता व सायबर धोके, तसेच आर्थिक फसवणूक आणि ऑनलाइन स्कॅम या विषयांवर तज्ज्ञांकडून सखोल मार्गदर्शन करण्यात आले. पॅनल चर्चा, संशोधन निबंध सादरीकरण आणि तज्ज्ञ सत्रांमुळे सहभागी विद्यार्थी व व्यावसायिकांना उपयुक्त व व्यावहारिक ज्ञान प्राप्त झाले.

31 MAR 2026

सकाळ

# डॉ. लंगरे यांना इंटरनॅशनल समर स्कूल शिष्यवृत्ती



डॉ. चंद्रकांत लंगरे

**कोल्हापूर :** नोबेल पुरस्कार विजेते लेखक टी. एस. एलियट यांच्या सन्मानार्थ ऑक्सफर्ड विद्यापीठाच्या मेरटन कॉलेजमार्फत आयोजित टी. एस. एलियट इंटरनॅशनल समर स्कूल उद्‌बोधन वर्गासाठी उपस्थित राहण्यासाठी आठशे पाउंड रकमेची शिष्यवृत्ती शिवाजी विद्यापीठाचे माजी इंग्रजी अधिविभागप्रमुख डॉ. चंद्रकांत लंगरे यांना मंजूर झाली. ही शिष्यवृत्ती सन्मानाची समजली जाते. चार ते १२ जुलै या कालावधीत आयोजित समर स्कूलसाठी डॉ. लंगरे ऑक्सफर्ड विद्यापीठाच्या मेरटन कॉलेजमध्ये टी. एस. एलियट यांच्या साहित्यावर आधारित उद्‌बोधन वर्गासाठी उपस्थित राहणार आहेत.

जनसंपर्क कक्ष
1 MAR 2026 तरुण भारत शिवाजी विद्यापीठ, कोल्हा

# शाहू संशोधन केंद्रास डॉ. पवार यांचे भरीव योगदान

प्रतिनिधी
कोल्हापूर

ज्येष्ठ इतिहास संशोधक डॉ. जयसिंगराव पवार यांनी जीवनकार्य म्हणून इतिहासाचे संशोधन व लेखन केले आहे. डॉ. पवार यांनी शिवाजी विद्यापीठाच्या शाहू संशोधन केंद्रासाठी भरीव योगदान दिले आहे, असे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठाच्या प्रभारी प्र-कुलगुरू डॉ ज्योती जाधव यांनी केले.

शिवाजी विद्यापीठाच्या राजर्षी शाहू सभागृहामध्ये शोकसभेत त्या बोलत होत्या. शिवाजी विद्यापीठाच्या शाहू संशोधन केंद्राचे मानद संचालक म्हणून त्यांनी अत्यंत महत्वाची जबाबदारी पार पाडली. इतिहासामध्ये जे घडले आहे ते प्रामाणिकपणे पुराव्यानिशी लोकांपर्यंत मांडणारे मूर्तीमंत उदाहरण होते. त्यांच्या दुःखद निधनामुळे इतिहासाचे, शिवाजी विद्यापीठाचे न भरून येणारी हानी झालेली असल्याचे डॉ. जाधव यांनी सांगितले.

इतिहास अधिविभागप्रमुख डॉ. अवनिश पाटील म्हणाले, डॉ. पवार दस्तऐवजांना महत्व देणारे, वस्तुनिष्ठ इतिहासाची मांडणी करणारे मान्यता प्राप्त इतिहासकार होते. डॉ. पवार यांनी व्यक्त केलेल्या मताला संपूर्ण राज्यात महत्वाचे स्थान होते.



■ प्रभारी प्र-कुलगुरू ज्योती जाधव यांचे प्रतिपादन

■ शिवाजी विद्यापीठात शोकसभा

यावेळी कुलसचिव डॉ.विलास शिंदे यांनी शोकप्रस्तावाचे वाचन केले. वित्त व लेखाधिकारी डॉ. सुहासिनी पाटील, वाणिज्य व व्यवस्थापन अधिविभागप्रमुख डॉ.श्रीकृष्ण महाजन, व्यवस्थापन परिषद सदस्य डॉ.रघुनाथ ढमकले, डॉ.निलांबरी जगताप, डॉ.देविकाराणी पाटील, सचिन घोरपडे यांनी शोकभावना व्यक्त केल्या. यावेळी व्यवस्थापन परिषद सदस्य अमरसिंग रजपूत, अधिविभागप्रमुख, शिक्षक, प्रशासकीय अधिकारी, उपस्थित होते.